REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 9 | JUNE - 2018

# नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावर शालाबाह्य विद्यार्थी असण्याच्या कारणांचा शोध व त्यावरील कृतिआराखडा निर्मिती- एक अभ्यास



**डॉ. राजेश गणपतराव पावडे**
**(M.A., M.Ed., M.Phil., M.B.A., D.S.M., Ph.D.)**
इंग्रजी विषय सहाय्यक , जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, नांदेड (महाराष्ट्र).

## १ प्रस्तावना

समता, सामाजिक न्याय, लोकशाही आणि मानवी समाजामध्ये न्यायाची प्रस्थापना, ही मूल्य बालकांमध्ये प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातून साध्य होवू शकतात. यादृष्टीने हा मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम अंमलात आणला आहे. त्यामुळे सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविण्याची त्यांना शाळांमध्ये प्रवेश देण्याची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी शासनाने स्विकारली आहे.

युनोस्कोच्या अहवालानुसार पौगंडावस्थेतील शाळाबाह्य मुले भारतात सर्वाधिक आहेत. हसतखेळत, निरागसपणे शिक्षण घेण्याच्या ऐन उमेदीच्या वयात मुलांचे शाळेच्या बाहेर असणे हे विकसनशील देशाला भविष्यातील धोक्याची घंटा आहे. भारतासारख्या विकसनशील देशात आजघडीला शाळेत न जाणाऱ्या मुलांची संख्या लक्षणिय आहे.

शिक्षणहक्क हक्क कायद्यानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना 25 टक्के आरक्षण देण्यात आले. शाळाबाह्य मुलांमधून अचानक शाळेत आलेल्या विद्यार्थ्याला शाळांमध्ये नियमित शिक्षण घेणाऱ्या मुलांच्या बरोबरीने या मुलांनाही शिकविण्याचे काम शाळांना करावे लागणार आहे.

शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रत्येक तीस मुलांमागे एक शिक्षक तरतूद केली असली तरीही शाळांमध्ये अशी परिस्थिती नसल्याचेच दिसून येते. पर्यायाने त्याचा विपरीत परिणाम गुणवत्तेवर होत आहे. नापास झालेली मुले शाळासोडून शिक्षण प्रवाहापासून बाहेर जावू नये म्हणून प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तर आणि आता इ. नववी पर्यंत त्या मुलाची पुन:परीक्षा घेवून पुढील वर्गात प्रवेशित करण्याचे धोरण शासनाने अंमलात आणले आहे. सुरूवातीच्या काळात शिक्षण व्यवस्था ही पुस्तककेंद्री होती. परंतू शिक्षणाच्या संदर्भात मागील काही वर्षाचा इतिहास पाहता आणि सद्य:स्थितीतील शैक्षणिक परिस्थिती लक्षात घेता कधी नव्हे एवढे महत्त्व शिक्षण प्रक्रियेला प्राप्त झाले आहे. यापूर्वी जी वर्तनवादी पद्धतीचा उपयोग केला जात होता ती बदलून नव्याने पद्धती येवू घातली आहे. ही पद्धती म्हणजे ज्ञानरचनावादी पद्धती ही पद्धती राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदद्वारा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 साली केंद्र सरकारने स्विकारली आहे.

नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची गळती जास्त व धारणा दर कमी असण्याच्या कारणांचा शोध व त्यावरील कृतिआराखडा निर्मिती प्रस्तुत संशोधनात केली आहे. तो सारांश रूपाने पुढील प्रमाणे सांगता येईल.

## २ सारांश :

### २.१ संशोधन समस्या विधान -

**" नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावर शालाबाह्य विद्यार्थी असण्याच्या कारणांचा शोध व त्यावरील कृतिआराखडा निर्मिती- एक अभ्यास"**

### २.२ कार्यात्मक व्याख्या

#### शालाबाह्य विद्यार्थी -

एखादा विद्यार्थी पहीलया वर्गात नोंदनी झाल्यानंतर प्राथमिक शिक्षण पुर्ण होण्याअगोदरच कायम स्वरूपी शाळा सोडून जातो तेव्हा त्यास गळती असे म्हणतात.

#### कृतीआराखडा-

एखादी समस्या निवारणासाठी योजलेल्या उपायासाठी आखण्यात आलेला नियोजनबद्ध कार्यक्रम म्हणजे कृतीआराखडा होय.

### २.३ संशोधनाची उद्दिष्टे -

संशोधन समस्येची उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

1. नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या गळती जास्त असण्याच्या कारणांचा शोध घेणे.
2. नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावरील मुले व मुली यांच्या गळती दराची तुलना करणे.
3. नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची गळती जास्त असण्याच्या कारणांवर करावयाच्या उपाययोजनांचा कृतिआराखडा निर्माण करणे.

### २.४ संशोधनाची गरज –

1. ज्या घटकाला शिक्षणाचा हक्क मिळण्याची गरज आहे, तो घटक म्हणजे शाळाबाह्य मुले. त्यामुळे शाळाबाह्य मुलांना पुन:श्च शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी संशोधन समस्येची गरज आहे.
2. नांदेड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची गळती जास्त व धारणा कमी असण्यामागच्या कारणांचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तूत संशोधन समस्येची गरज आहे.
3. गळती कमी व धारणा दर वाढविण्याच्या दृष्टीने कृती आराखडा निर्मिती करण्यासाठी संशोधन समस्येची गरज आहे.

### २.५ संशोधनाची व्याप्ती –

1. क्षेत्रव्याप्ती - संशोधन कार्य करण्यासाठी नांदेड जिल्हा हे क्षेत्र विचारात घेतले आहे .
2. आशय व्याप्ती - नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची गळती जास्त असण्याच्या कारणांचा अभ्यासल्याच्या बाबतीत विचार केला आहे.
3. घटक व्याप्ती - संशोधन कार्यात नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण, गळतीची कारणे व धारणा दर कमी असण्याची कारणे इत्यादी संदर्भात विचार केला आहे.

### २.६ संशोधनाच्या मर्यादा –

1. संशोधन कार्य नांदेड जिल्ह्यापुरतेच मर्यादीत आहे.

2. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची गळती आणि धारणा दर यांच्याशी मर्यादीत आहे.

### शोधन कार्यपध्दती -

संशोधन समस्या जेव्हा सद्य: स्थितीशी निगडीत असते तेव्हा संशोधक सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब करू शकतो . प्रस्तूत संशोधन समस्या ही वर्तमान परिस्थितीमध्ये अंतर्भूत असल्याकारणाने संशोधन कार्य पुर्णत्वास नेण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीची निवड केली आहे. संशोधन कार्य निर्दोष होण्यासाठी सुयोग्य माहितीचे संकलन साधन, प्रतिनिधिक नमुन्याची निवड, संकलीत महितीचे योग्य विश्लेषण आणि अर्थनिर्वचन अचूक व्हावे ह्या हेतूने संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीची निवड केली आहे.

### २.८ संशोधनाची जनसंख्या व न्यादर्श -

### संशोधनाची जनसंख्या -

नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावरील सर्व विद्यार्थी ज्यांची गळतीचे प्रमाण जास्त व धारणा दर कमी आहे यांचा समावेश संशोधनाच्या जनसंख्येत करण्यात आला आहे.

### संशोधनाचे न्यादर्श -

नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावरील विद्यार्थी गळतीचे प्रमाण जास्त व धारणा दर कमी आहे अशा नांदेड , मुखेड, किनवट ह्या तालुक्यांची निवड न्यादर्शात केली जाईल. सहेतूक न्यादर्श निवड संशोधनासाठी केली आहे.

### २.९ माहिती संकलन -

प्रस्तूत संशोधनामध्ये संशोधक विद्यार्थी, शिक्षक व मुख्याध्यापक यांच्याकडून माहिती प्राप्त करण्यासाठी प्रश्नावली साधनाचा उपयोग केला आहे.

### २.१० संख्याशास्त्रीय साधने व परिमाणे -

### संख्याशास्त्रीय साधने-

लघु संशोधनामध्ये समस्येची असलेली जाणीव व संशोधकाने निश्चित केलेली उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी संशोधकाने प्रश्नावली या साधनाचा वापर केला आहे.

### सांख्यिकीय परिमाणे-

प्रस्तूत संशोधनासाठी संशोधक संकलितमाहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्याकरिता शेकडेवारी या संख्याशास्त्रीय साधनाचा वापर केला आहे.

### ३ निष्कर्ष :

1. जास्तीत जास्त मुख्याध्यापक त्याच शाळेत मागील १ ते ३ वर्षापासून कार्यरत आहेत व काही मागील ८ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून त्याच शाळेत कार्यरत आहेत.
2. जास्तीत जास्त शाळेत विद्यार्थी संख्येप्रमाणे मुले व मुली यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छतागृह उपलब्ध आहेत.
3. प्रत्येक शाळेत शासकीय योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना दिला जातो.
4. जास्तीत जास्त शाळेत क्रीडांगण व क्रीडा साहित्य उपलब्ध नाही.

5. जास्तीत जास्त मुख्यापाकांनी प्राथमिक स्तरावर गळतीचे प्रमाण मुलींचे प्रमाण जास्त असल्याचे सांगितले
6. जास्तीत जास्त शाळेत किशोर वयीन मुला-मुलींसाठी मेळावे घेतले जातात.
7. सर्वच शाळेत गुणवत्ता व उपस्थिती वाढीसाठी चर्चासत्रे, बैठका व्याख्यान आयोजित केले जातात.
8. बाहेर गावाहून शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वाहतुकीची कोणतीही व्यवस्था नाही.
9. सर्व शिक्षकांच्या पाठाचे निरीक्षण केले जाते.
10. गळती झालेल्या/ सतत अनुपस्थितीत असलेल्या सर्वच विद्यार्थ्यांच्या पालकांच्या भेटी घेतल्या जातात.
11. जास्तीत जास्त मुख्याध्यापकांना गळती रोखण्यासाठी शासनाच्या विविध योजनांची मदत होईल असे वाटते
12. पालकांत जाणीव जागृतीव आर्थिक मदत केल्याने पालक मुलांना शाळेत पाठवतात.
13. जास्तीत शिक्षक ८ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून त्यांच्या शाळेत कार्यरत आहेत.
14. सर्वच शिक्षक अध्यापनात नियमितपणे शैक्षणिक साधनांचा वापर करतात असे दिसून येते.
15. बहुतांश शिक्षक अध्यापनात स्वनिर्मित शैक्षणिक साहित्य वापरतात.
16. जास्तीत जास्त शिक्षक घटक संपल्यावर प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना अध्ययन झाले आहे किंवा नाही हे नियमितपणे पाहतात.
17. विद्यार्थ्यांना एखादी संकल्पना समजली नाही तर १८(६०%) शिक्षक पुन्हा ती संकल्पना पूर्ण वर्गाला समजावून सांगतात.
18. जास्तीत जास्त शिक्षकांना विषय अध्ययनात काही विद्यार्थ्यांना शिकविताना अडचणी येतात.
19. विषय अध्ययनात काही विद्यार्थ्यांना शिकविताना शिक्षकांना अभ्यासात अनियमित विद्यार्थ्यांच्या बाबतीत अडचणी येतात.
20. विषय अध्ययनात काही विद्यार्थ्यांना शिकविताना शिक्षकांना अभ्यासात अनियमित विद्यार्थ्यांच्या बाबतीत २५(८३.३३%) संकल्पना लवकर समजत नाही ही अडचण येते.

### ४ कृतीआराखडा

| अ.क्र. | शाळा सोडण्याची कारणे | उपाययोजना |
|---|---|---|
| १ | अपंगत्वामुळे | विविध विद्यार्थीलाभांच्या योजनांची माहिती समजावून सांगणे. |
| २ | आई-वडिलांना शेतकामात मदत करावी लागत असल्यामुळे | पालक भेटी,शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, पालकांच्या व्यवसायाशी तडजोड |
| ३ | मोलमजुरी करावी लागत असल्यामुळे | शिक्षणाचे महत्व, शिक्षण घेतल्यानंतर होणारा लाभ शासनाच्या योजनांची माहिती होणे |
| ४ | शाळा घरापासून दूर अंतरावर असल्यामुळे | विविध सहशालेय व बहिर्शालेय उपक्रमाचे आयोजन करणे. विविध विद्यार्थीलाभांच्या योजनांची माहिती समजावून सांगणे. |
| ५ | शिक्षक सतत शिक्षा करत असल्यामुळे | पालक भेट,चर्चा,पालक सभा सांस्कृतिक कार्यक्रम, ज्ञानरचनावादी शिक्षण द्यावे, शाळेत आनंददायी शैक्षणिक वातावरण निर्माण करणे, |
| ६ | इतर विद्यार्थी चांगले वागत नसल्यामुळे | सहशालेय व बहिर्शालेय उपक्रमाचे आयोजन करणे, चांगल्या मुलांच्या संपर्कात आणावे, समुपदेशन |
| ७ | अभ्यासक्रम कठीण असल्यामुळे | ज्ञानरचनावादी शिक्षण द्यावे, शाळेत क्रिडागंण चांगले उपलब्ध करुन द्यावे |

## ५ समारोप :

नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची गळती जास्त असण्याच्या कारणांचा शोध व त्यावरील कृतिआराखडा निर्मिती ह्या संशोधनातून आपणास असे लक्षात येते की, प्राथमिक शाळा सोडण्याच्या कारणांमध्ये अपंगत्व, आई-वडिलांना शेतकामात मदत करावी लागणे, मोलमजुरी करावी लागणे, शाळा घरापासून दूर अंतरावर असणे, शिक्षक सतत शिक्षा करणे, इतर विद्यार्थी चांगले वागत नसणे, अभ्यासक्रम कठीण असणे ही प्रमुख कारणे आहेत.

गळती होण्यामध्ये स्त्री-पुरुष प्रमाण जवळपास सारखेच आहे. मुलगी म्हणून घरकाम, लहान भावंडांचा सांभाळ इत्यादी कारणांमुळे मुलींचे गळती होत असल्याचे दिसून आले.

वरील कारणांवर उपाययोजना म्हणून विविध विद्यार्थीलाभांच्या योजनांची माहिती विद्यार्थी व पालक यांना समजावून सांगणे, शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, पालकांच्या व्यवसायाची तडजोड, शिक्षणाचे महत्त्व शिक्षण घेतल्यानंतर होणारा लाभ शासनाच्या योजनांची माहिती होणे, विविध सहशालेय व बहिर्शालेय उपक्रमाचे आयोजन करणे, पालक भेट,चर्चा,पालक सभा सांस्कृतिक कार्यक्रम, सहशालेय व बहिर्शालेय उपक्रमाचे आयोजन करणे, नवोदय विद्यालय धर्तीवर तालुक्यात दोन ठिकाणी किमान 500 विद्यार्थी बसतील एवढ्या क्षमतेचे दर्जेदार विद्यालय तयार करणे हा कृती आराखडा तयार करता येईल.

## ६ शिफारशी:

### ६.१ शिक्षकांसाठी शिफारशी-

1. विविध सहशालेय व बहिर्शालेय उपक्रमाचे आयोजन करणे.
2. विविध विद्यार्थीलाभांच्या योजनांची माहिती समजावून सांगणे.
3. ज्ञानरचनावादी शिक्षण द्यावे

### ६.२ शासनासाठी शिफारशी-

1. आनंददायी शिक्षण पद्धत राबविण्यावर भर द्यावा
2. ज्ञानरचनावादी शिक्षणपद्धतीचा पुरस्कार करावा
3. स्त्री शिक्षकांची जास्तीत जास्त नेमणूक करावी

## संदर्भ ग्रंथ सूची :

**English Books:**

1) V.R. Bhintade (July 1994) Education Research Methodology, Nutan Publication, Pune.
2) Dr. Pradip Aaglave (2000) Research Methodology and Technology, Vidhya Publication, Nagpur.
3) B.G.Bapat (1995) Educational Research, Page no.220.
4) John W. Best(1981) Research in Education Publication Prenlice Hall of India P.V.T./limited New Delhi 4th Edition

**मराठी संदर्भ ग्रंथ:**

1) मुळे रा.श.व उमाटे वि.तू. (१९७७) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे ,नागपूर :महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ
2) भिंताडे वि.रा. (१९८९ ) शैक्षणिक संशोधन पद्धती ,नूतन प्रकाशन ,पुणे

3) पंडित बन्सी बिहारी (१९९७ ) शिक्षणातील संशोधन ,नित्यनूतन प्रकाशन ,पुणे

4) गमतीजमती अध्ययन पुस्तिका : म .रा .पाठ्यपुस्तक निर्मिती व आभ्यासक्रम संशोधन मंडळ ,पुणे